# ८. पर्यटन आणि इतिहास

मानवाला पूर्वीपासूनच फिरण्याची आवड आहे. उदा. तीर्थक्षेत्रांना भेटी देणे, विद्याभ्यासासाठी दूरच्या प्रदेशात जाणे इ. म्हणजे पर्यटन चालू होते.

**पर्यटन** - दूरवरच्या स्थळांना विशिष्ट हेतूने भेट देण्यासाठी प्रवास करणे म्हणजे पर्यटन होय.

19 व्या शतकाच्या उत्तरार्धात थॉमस कुकने 600 लोकांची रेल्वेसहल आयोजित केली. त्याने पूर्ण युरोपची सहल घडवून आणली. त्याने पर्यटन तिकिटे विकण्याचा एजन्सी व्यवसाय सुरू केला. यातून आधुनिक पर्यटन युग सुरू झाले.

**पर्यटनाचे प्रकार -** स्थानिक, आंतरराज्यीय, आंतरराष्ट्रीय, धार्मिक, ऐतिहासिक, आरोग्यपूरक, विज्ञान, कृषी, नैसर्गिक, क्रीज पर्यटन असे पडतात.

**स्थानिक व आंतरराज्यीय पर्यटन :**

हा प्रवास देशातल्या देशात असल्याने यात भाषा, चलन, कागदपत्रे यांचा अडथळा नसतो.

**आंतरराष्ट्रीय पर्यटन :** वाहतुकीच्या साधनांमुळे आंतरराष्ट्रीय पर्यटन करणे सोपे झाले. विमानांनी जग जवळ आले. आर्थिक उदारीकरणानंतर भारतातून परदेशात व परदेशातून भारतात येणाऱ्यांची संख्या वाढली. अभ्यास, व्यावसायिक कामे, चित्रपटाचे चित्रीकरण, स्थळदर्शन इ.मुळे आंतरराष्ट्रीय पर्यटन वाढले आहे.

**ऐतिहासिक पर्यटन :** लोकांचे इतिहासाच्या संदर्भातील कुतूहल लक्षात घेऊन ऐतिहासिक पर्यटन सहलींचे आयोजन केले जाते. उदा. शिवरायांचे किल्ले, राजस्थानातील किल्ले इत्यादी.

**भौगोलिक पर्यटन :** भौगोलिक वैशिष्ट्ये निरीक्षणासाठी पर्यटन केले जाते. उदा.अभयारण्य, लोणार सरोवर , निसर्गाचा आस्वाद घेणे, भौगोलिक माहिती जाणून घेणे यासाठी हे पर्यटन आहे.

**आरोग्य पर्यटन:** भारतातील वैद्यकीय सेवा, सुविधा स्वस्त, दर्जेदार असल्याने परदेशी लोकं भारतात येतात. भरपूर सूर्यप्रकाश मिळवण्यासाठी, योग्य शिक्षणासाठी,आयुर्वेदिक उपचारासाठी परदेशी पर्यटक भारतात येतात.

**कृषी पर्यटन :** कृषी जीवनाची माहिती शहरी लोकांना नसते. त्यासाठी कृषी पर्यटन हा प्रकार आहे.

**क्रीडा पर्यटन** :  म्हणजे भारतात व भारता बाहेरील आयोजित केलेले सामने, स्पर्धा, कुस्ती क्रीडा पर्यटन : स्पर्धा पाहायला जाणे म्हणजे क्रीडा पर्यटन होय.

**नैमित्तिक पर्यटन :** फिल्म फेस्टिव्हल, संमेलने, पुस्तक प्रदर्शने इत्यादी साठी लोक जात असतात.

ऐतिहासिक स्थळांच्या ठिकाणी काहीजण मद्याच्या पार्ट्या करतात. त्यावर चित्रे काढतात. या गोष्टी टाळायला हव्यात. उत्कृष्ट दुभाषे तयार करायला हवेत .

**ऐतिहासिक स्थळांचे जतन आणि संवर्धन**

ऐतिहासिक स्थळांचे जतन आणि संवर्धन करणे हे एक मोठे आव्हान आहे.  भारताला प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन अशा ऐतिहासिक स्थळांचा वारसा लाभलेला आहे. उदा. ताजमहल, जंतरमंतर, वेधशाळा, अंजिठा, वेरूळ इ. ही वारसा स्थळे पाहण्यासाठी देशी – परदेशी पर्यटक येतात. पण तेथील अस्वच्छता, त्या स्थळांचा केलेला दुरुपयोग इ . वाईट स्थिती बघायला मिळते.  यासाठी पर्यटन स्थळांची स्वच्छता ठेवणे. त्याचे विद्रुपीकरण टाळणे याकडे लक्ष दिले पाहिजे.

**पर्यटन आणि आतिथ्य क्षेत्रातील व्यावसायिक संधी**

पर्यटन हा सर्वाधिक रोजगार निर्माण होणारा उद्योग आहे.  परदेशी पर्यटकांपासून खूप उत्पन्न मिळते. त्याने भरलेल्या व्हिसा फी मुळे आपल्याला महसूल मिळतो.  प्रवासखर्च, हॉटेलमध्ये राहणे, खाणे, दुभाष्याची मदत घेणे, वर्तमानपत्रे, संदर्भ साहित्य विकत घेणे, आठवण म्हणून स्थानिक वस्तूंची खरेदी इ. मुळे परदेशी पर्यटकांकडून उत्पन्न मिळते. स्थानिक खाद्यपदार्थ त्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळतो.

**महाराष्ट्रातील पर्यटनाचा विकास**

इ. स. 1975 मध्ये ‘महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची’ स्थापना झाली. त्यामुळे महाराष्ट्रातील पर्यटनाला चालना मिळाली आहे. या महामंडळाने ४७ ठिकाणी पर्यटक निवासाची सोय केली आहे. अनेक खाजगी व्यावसायिक ही या व्यवसायात उतरले आहेत.